जिल्हा परिषद अमरावती

# मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय

दूरध्वनी क्रमांक ०७२१ २६६२९२६
ई-मेल – ceozp.amravati@maharashtra.gov.in

जा.क्र. – जिप/मुकाअ/स्वी.स./ ५९२२ /२०२५ दिनांक२/१/२०२५

प्रति,
१. सर्व विभाग प्रमुख...जि.प. अमरावती.
२.पंचायत समिती/उप विभाग..........सर्व. जि.प. अमरावती.
३. सर्व अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी(सर्व योजना)
विभाग/कार्यालय जिल्हा परिषद अमरावती.

<u>विषय</u> - <u>Wall of Fame</u> ......
(Best Employee of the Month) जि.प.सवंर्ग अधिकारी-कर्मचा-यांच्या कार्यक्षमेच्या सन्मानासाठी नावीन्यपूर्ण संकल्पना...

स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना आणि उपक्रम राबविले जात आहेत. त्यासाठी जिल्हा परिषद संवर्ग अधिकारी-कर्मचारी आणि विविध उपक्रमातील कंत्राटी कर्मचारी यांचेकडून यशस्वीतेसाठी प्रयत्न होत असतात. विहित कालावधीत उदिष्टपूर्ती करणे हे जरी कर्मचा-यांचे कर्तव्य असलेतरी प्रत्येक महिन्यात उत्कृष्ट कार्य आणि उदिष्टपूर्ती करणारे यांची Best Employee of the Month म्हणून निवड करुन त्यांचा योग्य सन्मान झाल्यास त्यांचेकडून इतरही कर्मचा-यांनी प्रेरणा मिळावी आणि कार्यालयीन कार्यक्षमतेत वाढ व्हावी यासाठी या नविन वर्षापासून Wall of Fame ही संकल्पना अमरावती जिल्हा परिषदेतर्फे सुरु करण्यात येत आहे.

Wall of Fame वर Best Employee of the Month म्हणून निवड झालेल्या कर्मचा-यांचे छायाचित्र प्रसिध्द करण्यात येणार आहे. प्रत्येक महिन्याला वेगवेगळया क्षेत्रातील तीन कर्मचा-यांची निवड संबधित खाते प्रमुखांनी शिफारस केल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली निवड समिती करणार आहे. तसेच कर्मचारी सुध्दा स्वत:हून आपली माहिती खालील दिलेल्या QR कोडवर सादर करु शकतील.

यासोबतच ज्या कार्यालयाच्या उपक्रमाचा किंवा कामाचा राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावर गौरव केला गेला असेल अशा कामांची वेगळी ओळख म्हणून Wall of Fame छायाचित्र प्रकाशित करुन सन्मान केला जाईल.. हया उपक्रमाची अधिक माहिती खालील QR कोड वरुन आपल्याला घेता येईल.

नविन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छासह!




(संजीता महापात्र,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रतिलिपी-
१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा समिती सदस्य जिल्हा परिषद अमरावती यांना अग्रेषित.
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य जिल्हा परिषद अमरावती तथा समिती सदस्य जिल्हा परिषद अमरावती यांना अग्रेषित.
३. संबंधित खाते प्रमुख, तथा समिती सदस्य जिल्हा परिषद अमरावती यांना अग्रेषित.